**आदेश निशाणी ७० खाली**

१. वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला पाच महिन्याचा विलंब माफ करून अर्ज मंजुर करण्यात यावा यासाठी सदरचा अर्ज वादीतर्फे दिलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ४, ७ व ८ तर्फे वकीलांनी दिलेले म्हणणे वाचले. इतर प्रतिवादींनी त्यांना संधी देवुनही त्यांचे म्हणणे दिले नाही.

२. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी क्र. १ हे दिनांक २०.०४.२०१७ रोजी मयत झाले आहेत. परंतु, सदर अर्ज दाखल करण्यास पाच महिन्यांचा विलंब झाला आहे, कारण प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असल्याची माहीती वादी क्र. १ च्या वारसांना नव्हती. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा. प्रतिवादी क्र. ४, ७ व ८ तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जातील नमुद कारण कायदेशिर व योग्य नसल्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचे प्रकरण मालकी घोषीत करून निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केले आहे. प्रकरण स्थावर मिळकतीबाबत असुन वादी व प्रतिवादींचे कायदेशिर हक्क त्यामध्ये गुंतलेले आहेत. अर्जातील नमुद कारण पाहता, सदरचा अर्ज न्यायहेतू मंजुर करून वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुत अर्ज २५०/- रूपये दंड लावुन मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरचा दंड प्रतिवादी क्र. ४, ७ व ८ यांना द्यावा.

दिनांक : ०५.०३.२०१८

**( प्रि.म. पाटील )**
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.